# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १९/०४/२०२५ (शनिवार)**

---

## उमरेड शहरात कोसे ले आउट येथे अवकाशातुन धातुचा तुकडा कोसळल्याबाबत

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक १९/०४/२०२५ रोजी पोलीस स्टेशन उमरेड येथे सकाळी ०९:३० वाजता माहीती प्राप्त झाली की, अमय भास्कर बसेशंकर, रा. कोसे ले आउट उमरेड यांचे राहते घराचे स्लॅबवर दिनांक १९/०४/२०२५ रोजी पहाटे ०४:०० वाजेच्या सुमारास एक जाड लोखंडी वस्तुचा पत्रा तुटुन पडला आहे.अशी माहीती मिळताच पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक, ठाणेदार पोलीस स्टेशन उमरेड  हे पोलीस स्टाफ सह तात्काळ सदर घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळी पोलीसांनी पाहणी केली असता एक जाड लोखंडी पत्रा अर्धवट तुटलेल्या अवस्थेत घराच्या स्लॅबवर पडलेला दिसुन आला. त्यामुळे अमय भास्कर बसेशंकर, रा. कोसे ले आउट उमरेड यांचे घराचे भिंतीचे किरकोळ नुकसान झाल्याचे दिसुन आले.सदर घटनेत कोणत्याही प्रकारची जिवीतहानी झालेली नसुन **सदर धातुचा तुकडा (पत्रा) उमरेड पोलीसांनी ताब्यात घेतला असुन पोलीस स्टेशन उमरेड येथे जमा करण्यात आला आहे. सदर धातुच्या पत्रा बाबत तपासणी कामी नागपुर येथील फॉरेन्सीक पथक ,याना बोलावुन सदर बाबतीत सखोल तपासणी/चौकशी सुरू आहे.सदर प्रकरणी उमरेड पोलीसांनी योग्य कायदेशिर कारवाई करण्याची दक्षता ठेवली आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन अरोली** :— दिनांक १८/०४/२०२५ रोजी अरोली पोलीस हद्दीत पेट्रलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस मौजा घोटी येथे नाकाबंदी केली असता पोलीसांना एक संशयीत हिरव्या रंगाच्या जॉन डिअर कंपनीचा विना क्रमाकाचा ट्रक्टर ज्यास हिरव्या रंगाची ट्रॉली जोडलेली असे मिळुन आले. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **वाहन चालक आरोपी नामे प्रज्वल नेमराज सिंद्राम,वय २५ वर्ष , पत्ता. रा. घोटी ता रामटेक, याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच सदर वाहन मालकाचे नाव विचारले असता वाहन मालक रोशन पुरूषोत्तम चौके,वय २९ वर्षे, रा. घोटी ता रामटेक अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष **१)** १ ब्रास रेती आणि **२)** क हिरव्या रंगाच्या जॉन डिअर कंपनीचा विना क्रमाकाचा ट्रक्टर ज्यास हिरव्या रंगाची जोडलेली ट्रॉली **असा एकुण ७,०६,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद ट्रॅक्टर चालक /मालक आरोपी **याच्या** विरूध्द पोस्टे अरोली येथे **कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम , कलम ०३ सार्व. संपत्ती नुकसान अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ७ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक १७/०४/२०२५ रोजी मौदा पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा मौजा चिरव्हा येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता आरोपी नामे १) नाना नथ्थु निंबार्ते , वय ५२ वर्षे, २) महादेव बळीरात बांते ,वय ७२ वर्षे, ३) सतीश ज्ञानेश्वर तिजारे, वय ३२ वर्षे, ४)नरेंद्र पंडीत बांते, वय ५० वर्षे , ५)विलास चांगोजी बांते वय ४१ वर्षे ६) सुनिल प्रभाकर तिजारे वय ५०वर्षे, ७) शिवलाल दुधराम कनपटे वय ४१ वर्षे सर्व रा. चिरव्हा ता मौदा जि.नागपुर हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तासपत्त्यांसह रोख रक्कम २८५०/— रूपयांचा**

**मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द कलम १२(अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## प्रेसनोट — पोलीस स्टेशन सावनेर

दिनांक १४/०४/२०२५ रोजी रात्री २३/०० वा दरम्यान पोलिस स्टेशन सावनेर हददीतील सुभाष शाळेजवळील एका घरात एक अज्ञात इसमाने प्रवेश केला असल्याच्या माहीतीवरून सावनेर पोलीस घटनास्थळी पोहचले. पोलिसांनी सदर घरामध्ये शोध घेतला असता एक ईसम मिळुन आला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव राजेश बाबुलाल पवार, वय ५१ वर्षे, रा. बैतुल मध्यप्रदेश ह.मु. कबीर सायकल स्टोअर्स, सावनेर असल्याचे पोलिसांनी ज्या घरात सदर ईसमाने प्रवेश केला होता त्यांना मोबाईल द्वारे कॉल करून पोलिस स्टेशन येण्यास सागितले असता सदर घरमालक हे नागपुर येथे असल्याने उदईक रोजी येण्याचे सागितले. सदर घरमालक हे पोलिस स्टेशन येथे हजर न झाल्याने सदर ईसमाच्या कबीर सायकल स्टोअर्स चे मालकास सुचनापत्र व त्याच्या पत्नीला मोबाईलद्वारे कॉल करून सदर ईसमास सुचनापत्र देवुन सोडण्यात आले.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**